**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सिताराम महाराज साखर कारखाना (खर्डी) लिमिटेड, ७९८/१, ७९८/२, ७८०/२/१. ७९५/२, ७९७/२, ७९७/३,७९३/१, ७९३/२, ७९४/१, ७९४/२, ७८५/१, २५ खर्डी, तालुका-पंढरपूर, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस_गाळप क्षमता - २,५००.० मे. टन प्रतिदिन वरुन ५,०००.० मे. टन प्रतिदिन ( २,५००.० मे. टन प्रतिदिनने वाढ), सहवीज निर्मिती प्रकल्प १०.० मे. वॅट वरुन १८.० मे.वॅट (८.० मे. वॅटने वाढ), तसेच प्रस्तावित मळीवर आधारित (मोलॅसिस/सिरप) ११०.० किलो लिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापना करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सिताराम महाराज साखर कारखाना (खर्डी) लिमिटेड, ७९८/१, ७९८/२, ७८०/२/१. ७९५/२, ७९७/२, ७९७/३,७९३/१, ७९३/२, ७९४/१, ७९४/२, ७८५/१, २५ खर्डी, तालुका-पंढरपूर, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता - २,५००.० मे. टन प्रतिदिन वरुन ५,०००.० मे. टन प्रतिदिन ( २,५००.० मे. टन प्रतिदिनने वाढ), सहवीज निर्मिती प्रकल्प १०.० मे.वॅट वरुन १८.० मे.वॅट (८.० मे. वॅटने वाढ), तसेच प्रस्तावित मळीवर आधारित

(मोलॅसिस/सिरप) ११०.० किलो लिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापना करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक ०२ फेब्रुवारी , २०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री निखील जालिंदर मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. शमा पवार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री शंकर एल. वाघमारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय,

भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना करण्यात येते. त्यानुसार, दोन व्यक्तींमध्ये अंतर ठेवणे, सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या जागी करण्यात आलेला असून बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स सिताराम महाराज साखर कारखाना (खर्डी) लिमिटेड, ७९८/१, ७९८/२, ७८०/२/१. ७९५/२, ७९७/२, ७९७/३,७९३/१,

७९३/२, ७९४/१, ७९४/२, ७८५/१, २५ खर्डी, तालुका-पंढरपूर, जिल्हा - सोलापूर, महाराष्ट्र यांचा त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता - २,५००.० मे. टन प्रतिदिन वरुन ५,०००.० मे. टन प्रतिदिन ( २,५००.० मे. टन प्रतिदिनने वाढ), सहवीज निर्मिती प्रकल्प १०.० मे.वॅट वरुन १८.० मे.वॅट (८.० मे. वॅटने वाढ), तसेच प्रस्तावित मळीवर आधारित (मोलॅसिस/सिरप) ११०.० किलो लिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापना करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए आसवणी - ५ (जी), साखर उद्योग - ५ (जे), मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य

जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०६-०७-२०२२ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १५-०७-२०२२ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी प्रत्यक्ष पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार , दिनांक ०२ जानेवारी, २०२३ रोजी दुपारी १२. ३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-०७ / २०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०११९- एफटीएस ०१४९ दिनांक

१९-०१-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक वृत्तपत्र संचार यात मराठी व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक ०२-०१-२०२३ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्‌योग केंद्र, सोलापूर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-पंढरपूर, तालुका- पंढरपूर, जिल्हा- सोलापूर,

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती-पंढरपूर, तालुका- पंढरपूर,जिल्हा- सोलापूर,

७) ग्रामपंचायत कार्यालय - मौजे- खर्डी, शेटफळ, संगेवाडी, उंबरगाव, तनळी , शिरमावी, मेथवडे, मारापूर, जिल्हा- सोलापूर,

८) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

९) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई,

१०) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-पुणे , महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, ३ रा मजला, जुना पुणे - मुंबई रस्ता, वाकडेवाडी, पुणे - ४११ ००३

११) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ब/४, बळी बिल्डिंग, सिव्हिल लईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३

१२) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई,

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल.

त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पासाठी गुंतवणूक ३१९.१९ कोटी रूपयांची आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च - रुपये २,९१५.० लाख, तर आवर्ती खर्च - रुपये ३१४.० लाख रुपये आहे.

सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **<u>श्री संतोष विश्वनाथ पवार, राहणार-मेठवडे, तालुका-सांगोला, जिल्हा-सोलापूरः-</u>**

आम्ही मेठवडे गावाचे रहिवाशी आहोत. कारखान्यातून सोडलेल्या सांडपाण्यामुळे मेठवडे गावातील पाण्याचे स्त्रोत हे खराब झालेले आहेत. कारखान्यातील मळी आमच्या परिसरात सोडल्यामुळे आमच्या येथे दुर्गंधी पसरलेली आहे. सांडपाणी ज्याठिकाणी सोडण्यात येते, त्याच्या शेजारीच शाळा आहे. सादरीकरण असे सांगण्यात आलेले आहे की प्रकल्पातून सांडपाणी बाहेर सोडण्यात येणार नाही. तरी सांडपाणी बाहेर सोडणे कधी बंद होणार आहे, याबाबत खुलास करण्यात यावा. गेले तीन वर्षे सांडपाणी बाहेर सोडण्यात येते आहे व आताही सांडपाणी सोडण्यात येते. ते यावर्षीच बंद करण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तक - प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की एक मालक म्हणून फक्त गेल्याच वर्षी आम्ही कारखाना ताब्यात घेतलेला आहे. येथे काय काय बदल करावे लागतील याचा प्रथम अभ्यास करण्यात आला. कारखान्यतील तांत्रिक बदल करत असतानाच अगदी अल्प काळात प्रक्रिया केलेले सांडपाणी प्रकल्पाच्या बाहेर न सोडण्याचा प्रयत्न केला.

मागच्या वर्षीच प्रकल्पात सीपीयुची निर्मिती केली /प्रकल्पात कार्यान्वित करण्यात आलेला आहे. प्रकल्पातील सांडपाण्यावर प्रक्रिया करुनच, त्याचे परिक्षण केल्यानंतरच कारखान्याच्या मालकीच्या १३ एकर जागेत ते सोडण्यात येतें. ते प्रकिया केलेले सांडपाणी घातक नाही.

मागच्या वर्षीपासूनच प्रक्रियेत उत्पन्न होणारे सांडपाण्याचा प्रक्रिया केल्यानंतर प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर केल्यानंतरही शिल्लक राहिलेले प्रक्रिया केलेले सांडपाणी हे कारखान्याच्या मालकीच्या जागेतच सोडण्यात येत होते. आता विस्तारिकरण प्रकल्प हा भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार झिरो लिक्विड डिस्चार्ज म्हणजे शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प असेल. प्रकल्पातून पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाच्या बाहेर सोडण्यात येणार नाही. प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुनच उत्पादन प्रक्रियेतच त्याचा पुनर्वापर करण्यात येईल. त्याचप्रमाणे ते पाणी ग्रॅन्युअल स्वरुपात उत्पन्न करुन त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात येईल. पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

२) **श्री माधव रामा माने, राहणार- तपकीरी शेटफळ, तालुका- पंढरपूर, जिल्हा-सोलापूरः-**

हा प्रकल्प लवकरात लवकर चालू व्हावा व परिसरातली शंभर मुले कामाला लागावीत हेच माझे म्हणणे आहे.

३) **श्री सोमनाथ आरे, राहणार- तपकीरी शेटफळ, तालुका- पंढरपूर, जिल्हा-सोलापूरः-**

आता जो कारखाना चालू आहे, तो योग्यप्रकारे चालू असून आमच्या भागातील बरीच मुले ही या कारखान्यात काम करत आहेत. आमच्या भागात बरीच तरुण सुशिक्षित मुले आहेत. तर विस्तारिकरण प्रकल्पात व नवीन आसवणी प्रकल्पात भूमिपुत्रांना रोजगाराची संधि मिळेल काय?

प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले की सध्या प्रकल्पात साधारण ४०० लोक काम करतात. त्यातील २५० कामगार हे कायम स्वरुपी असून १५० कामगार हंगामी स्वरुपात घेण्यात येतात. त्यातील ३३० कामगार हे परिसरातील, आसपासच्या गावातीलच आहे. त्यातील काही कामगार हे कौशल्यधारित (Skilled) होते व काही कामगार कौशल्यधारित नव्हते. तर जे कौशल्यधारित नव्हते, त्यांना प्रकल्पात प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांना रोजगाराची संधि देण्यात आली. आतापर्यंत ह्या कारखान्याचे उत्पादन हे २,५०० टीसीडी होते. प्रकल्प विस्तारीकरणास मान्यता मिळाल्यानंतर हा कारखाना ५,००० टीसीडी उत्पादन करेल व नवीन आसवणी प्रकल्प उभारणीनंतर सुमारे १००-१२५ कौशल्यधारित अतिरिक्त कर्मचारी, कामगारांची गरज भासेल. तर ते कर्मचारी, कामगार हे याच परिसरातील, आसपासच्या गावातीलच घेण्याचा आमचा १००% प्रयत्न आहे. परिसरातील आटीआय महाविद्यालयांना प्रकल्पातर्फे विनंती करण्यात येणार आहे की याच परिसरातील, आसपासच्या गावातीलच कौशल्यधारित युवक युवतींची नावे पाठविण्यात यावीत, त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात येईल.

परिसरातील दोन महाविद्यालयांनी याच परिसरातील, आसपासच्या गावातीलच कौशल्यधारित युवक युवतींची नावे देण्याचे कबूल केलेले आहे. प्रकल्प व्यवस्थापन परिसरातील युवक युवतींना रोजगाराची संधि देण्यास बांधिल आहे.

४) **श्री समाधान रोंगे, राहणार-खर्डी, तालुका-पंढरपूर, जिल्हा-सोलापूरः-**

आमच्या गावातील ऊसाचे प्रश्न हे या कारखान्यामुळे अगदी १००% मिटलेले आहेत. येथील मुलांना प्रकल्पामुळे रोजगाराची संधि मिळाली व प्रकल्पामुळे आजूबाजूच्या परिसरातील गावात अप्रत्यक्ष व्यवसायात मोठी वाढ झालेली आहे. मी गावातील व आसपासच्या गावातील लोकांतर्फे कारखाना प्रशासनाचे आभार मानतो की त्यांनी हा कारखाना सुरु केला.

आता प्रकल्प विस्तरिकरण व नवीन आसवणी प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराची नवीन संधि मिळणार आहे. तर जे काही स्थानिकांचे छोटे, मोठे प्रश्न असतील, त्याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन कारखान्यास पाठिंबा देणे गरजेचे आहे. इतरांप्रमाणे मीही काही प्रश्न घेऊन गेलो, कारखाना प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतला. कारखाना सामाजिक कामही चांगले करत आहे. तरी प्रकल्पास शुभेच्छा देताना सदरहू प्रकल्पास त्वरित मान्यता देण्याची विनंती मी शासनास करतो.

५) **श्री संजय चौगुले, राहणार- गुंजेगाव, तालुका--मंगळवेढा, जिल्हा-सोलापूरः-**

माझी द्राक्षबाग व ऊसबाग आहेत. त्यासाठी मी घेत असलेले पाणी हे तपासून घेतो, पाण्याचा पीएच, टीडीएस, बीओडी, सीओडी, क्लोराईड, सल्फेट्स तपासून घेतल्याशिवाय मी बागांना पाणी देत नाही. तर आतापर्यंत बारा वर्षे काहीही अडचण आलेली नाही. प्रकल्प प्रवर्तक १८ मेगावॅटचा सहविद्युत प्रकल्प व ११०.० केएलपीडी आसवणी प्रकल्प उभारणी करत आहे, तर भविष्यात त्यामुळे प्रदूषण होऊन काही अडचण येईल काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी जागरूक शेतकरी म्हणून त्यांचे अभिनंदन केले, कारण प्रथम पाणी तपासून शेतीस देतात. प्रकल्पामुळे भुपृष्ठावरील पाणी (Surface Water) व भूगर्भातील पाणी (Ground Water) प्रदूषित होण्याची शक्यता असते. तर आपणच सांगितले की पाणी तपासून ते शेतीसाठी योग्य आहे म्हणूनच आपण गेले बारा वर्षे पाणी वापरत आहात. प्रकल्प व्यवस्थापनास ही दिलासा देणारी गोष्ट आहे.

विस्तारिकरण प्रकल्प व नवीन आसवणी प्रकल्पामुळे प्रकल्प उत्पादनात अतिरिक्त रसायने वापरावी लागतील जी आतापर्यंत वापरली नाहीत. त्यामुळे प्रदूषण न होण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निर्देश पाळण्यात येतील. जर उत्पन्न होणारे सांडपाणी जमिनीत मिसळले, तरच प्रदूषण होते, त्यामुळे सांडपाण्याचे ग्रॅन्युअल्स तयार करणार आहोत. ते कंपोस्ट किंवा वीट तयार करण्यास उपलब्ध करून देण्यात येईल.

त्यामुळे तयार होणारे सांडपाणी हे जमिनीत मिसळणारच नाही. त्यामुळे प्रदूषण होणारच नाही.

६) **<u>श्री सुनंदा रेड्डी, राहणार-तेलंगण-</u>**

प्रकल्प विस्तारासाठी आणि नवीन आसवणी प्रकल्प स्थापना संदर्भात माझ्या शुभेच्छा. उद्योगांना पाठिंबा देणारा मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे. वयाच्या ६५ व्या वर्षी मी भारतातील सर्वात निरोगी पर्यावरणवादी आहे.

मी उद्योगांना का पाठिंबा देत आहे, कारण माझ्या मते बेरोजगारी हे समाजाचे मोठे प्रदूषण आहे. पाणी, हवा, माती, ध्वनी प्रदूषण कोणत्याही टप्प्यावर नियंत्रित करता येते. येथे मी व्यवस्थापनाला काही सूचना देत आहे-

तुमच्या सल्लागाराने अगोदरच EIA अहवाल तयार केला आहे. तो खूप चांगला आणि समाधानकारक आहे. मी काही सूचना देत आहे -

अ) तुम्ही जी काही झाडे लावणार आहेत , तर सामान्य झाडांऐवजी फळ देणारी झाडे, औषधी वनस्पती लावण्यात याव्यात. ते भविष्यासाठी अत्यंत उपयुक्त असून औषधी मूल्याच्या वनस्पतींमुळे वायू प्रदूषणावर नियंत्रण करत येईल. मी तुम्हाला CSR फंडातून झाडे लावण्यासाठी विनंती करत आहे, तुम्ही ते करू शकता. अतिरिक्त निधीची आवश्यकता नाही;

ब) तसेच, मी विनंती करतो की, शक्य असल्यास, जनतेची आरोग्याची स्थिती, पिकांच्या उत्पादनाची स्थिती आणि भूगर्भातील पाण्याच्या उपलब्धतेचे सर्वेक्षण करण्यात यावे. पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी सावधगिरीचे उपाय करणे भविष्यात खूप उपयुक्त आहे. जरी असे सर्वेक्षण करणे अनिवार्य नसले, तरी शक्यतो करण्यात यावे.

क) मी सीएसआर निधी योग्य प्रकारे खर्च करण्यासाठी गावचे सरपंच, व्यवस्थापन आणि अधिकाऱ्यांसह एक समन्वय समिती स्थापन करण्याची विनंती करत आहे. त्यांच्या सभेत "डिमांड ओरिएंटेड वर्क" घेण्यास मंजूरी देण्यात यावी. त्यामुळे कंपनी व्यवस्थापनास विश्वासार्हता प्राप्त होईल.

सदरहू उद्योग हा "शेतकरी मित्र उद्योग" असल्याने एक व्यावहारिक पर्यावरणवादी म्हणून, मी पर्यावरण मंत्रालयाकडे मागणी करत आहे, जर शक्य असेल तर कृपया अशा उद्योगांना जनसुनावणी प्रक्रियेतून सूट देण्यात यावी. अलीकडेच कोरोना महामारीमध्ये, अंतरिम तारखांना सार्वजनिक सुनावणीतून सूट देण्यात आलेली आहे.

नुकतेच नागपूर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सार्वजनिक उपयोगासाठी किरकोळ धातूसाठी जनसुनावणीतून सूट देण्याचा निर्णय घेतला आहे, वास्तविक खते, कीटकनाशके, वाहनांचे प्रदूषण यासारख्या उद्योगांमध्ये प्रदूषण होऊ शकते आणि अन्न घेण्याच्या प्रक्रियेच्या सवयी काय आहेत, या 4-5 वस्तूंचा प्रदूषणावर परिणाम होत आहे.

ह्या प्रकल्पात एकूण प्रदूषणाच्या केवळ 1/10 वा प्रदूषण आहे. या प्रकल्पामुळे अत्यंत किरकोळ प्रदूषण होऊ शकते.

प्रकल्प व्यवस्थापन 300 कोटी रुपये खर्च करत आहे, प्रकल्पात 100 लोकांना प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. त्यामुळे केलेल्या अभ्यासानुसार 1,500 अप्रत्यक्ष लोकांना त्याचा फायदा होईल. हा अतिशय महत्त्वाचा पैलू आहे.

सरकारच्या मदतीने तुम्ही ऊस पिकांमध्ये ठिबक सिंचनाला प्रोत्साहन दिल्यास मोठी विश्वासार्हता तुमच्यामुळे निर्माण होईल. शासनाच्या मदतीने पाण्याची बचत करण्यासाठी पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीने तांत्रिक मार्गदर्शन करावे. पुन्हा एकदा माझ्या या प्रकल्पाला शुभेच्छा.

मी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यान प्रकल्पास बिनशर्त परवानगी प्रदान करण्याची विनंती करत आहे.

**प्रकल्प प्रवर्तक - मुख्य कार्यकारी अधिकारी** यांनी प्रकल्पास पाठिंबा दिल्याबद्दल धन्यवाद दिले. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाल्या की, आपण सांगीतले की, वृक्षारोपण जास्त करण्यात यावे. त्यामुळे हवा प्रदूषण नियंत्रणात येईल. त्यांनी सांगितले की, मी स्वतः एक एनजीओ सांभाळत आहेत. आम्ही वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात केलेले असून त्याबद्ल २००५ मध्ये महाराष्ट्र राज्याच वनश्री पुरस्कार मिळालेला आहे. पाच हजार झाडे लावली व ती जपली होती. सिताराम महाराज परिवाराचे जे मुख्य आहेत, त्यांच्यातर्फे

आम्ही ६१,००० झाडे दान दिलेली आहेत. त्याचप्रमाणे फळझाडे व औषधी वनस्पती लावण्याचे आवाहन केलेले आहे. आम्ही जास्तीजास्त आंब्याची झाडे दान देत असतो.

आपण अशी सूचना केली की, सीएसआर विनियोगासठी एक समन्यवयक समिती स्थापन करण्याची सूचना केलेली आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितलेले आहे की, पुढील तीन वर्षेतच आम्ही २.3 कोटी खर्च करणार आहोत.

आपण सूचना केल्याप्रमाणे जेथे सीएसआर विनियोगासाठी प्रथम एक समन्वयक समिती स्थापन करुन त्याच्याशी चर्चा करुन त्याप्रमणेच विनियोग करण्यात येईल.

गेले दिड वर्षात जे नागरीक परिक्षा देत आहेत. त्यांना सुविधा उपलब्ध नाहित. नागरीक परीक्षा देण्यासाठी १० वी, १२ वी नंतर स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासिका उपलब्ध करुन दिली. येथील काही शिक्षक त्यांनी विना मोबदला शिकविण्याची तयारी करत होते. त्यांना टेबल, खुर्ची, कपाट, प्रोजेक्टर, संगणक पुरविण्यात आलेले आहेत. आमच्या मदतीनंतर गावातील लोकांनीही त्यांना मदत केली. तेथील विद्यर्थीनी अभ्यास करुन स्पर्धा परिक्षेत यश मिळविलेले आहे. एका वर्षात त्याचा फायदा दिसून आला की तेथील मुलांना नोकरीची संधिसुध्दा मिळाली आहे.

मागच्या वर्षी शिक्षण घेणा-या मुलींना आम्ही २५ सायकली दिल्या. त्याचप्रमाणे आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आलेली आहेत. २५०-३०० लोकांनी रक्तदान केलेले आहे.

आषाढी वारी दरम्यान औषधांचे वाटप, अन्नाची पाकिटे वाटण्यात आली. त्याचा सुमारे पाच हजार वारक-यांनी लाभ घेतला.

आपण जी सूचना केली की, बेकारी हेच मोठे प्रदूषण आहे, तर बेकारी हे प्रदूषण नसून बेकारीमुळे असुरक्षितता, नैराश्य येते. प्रकल्प विस्तारिकरण व नवीन आसवणी प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड वाढ होईल, त्याचा फायदा सुमारे १,५०० लोकांना होईल. त्याचप्रमाणे या साखर कारखान्याचे ५,००० पेक्षा जास्त शेतकरी सभासद आहेत, जे कारखान्यात ऊसपीक गाळपासाठी देतात. त्यांचीही आम्ही काळजी घेतो. फक्त रोजगाराचे आश्वासन न देता रोजगार निर्मिती करणे हे आम्ही आमचे कर्तव्य मानतो. आम्हांला सांगण्यास आनंद वाटतो की यावर्षी सर्व सभासदांचे ऊसपीकाचे पैसे अदा करण्यात आलेले असून आम्ही कार्यरत कर्मचा-यांना वेतन व दरवर्षी वेतनवाढ अदा करतो.

७) **<u>श्री मारुती संभा माताळ, माजी सरपंच</u>, <u>राहणार- तपकीरी शेटफळ, तालुका- पंढरपूर, जिल्हा-सोलापूरः-</u>**

हा सीताराम महाराज साखर कारखाना उभारणी येथील शेतक-यांना हवी होती म्हणून या कारखान्यास तपकीरी शेटफळ ग्रामपंचायतीच्या मान्यतेने पाणी पुरवठा करण्यात आला. या

कारखान्यामुळे तपकिरी शेटफळचा फायदा झालेला आहे. मागच्या वर्षी येथील कारखाने बंद होते, मात्र या कारखान्याने संपूर्ण गाळप केले व त्यामुळे शेतक-यांचे नुकसान टाळले. या कारखान्यात कुठल्याही राजकीय पक्षाचा विचार न करता शेतक-यांच्या मुलांना रोजगाराची संधि देण्यात येते. या कारखान्यात शेतकरी सभासदांना वेळेवर उसाच्या पीकाचे बील देण्यात येते, कामगारांनी वेळच्यावेळी पगार दिला जातो. तरी या विस्तारिकरण व नवीन आसवणी प्रकल्पास शासनाने मान्यता द्यावी अशी मी शासनास विनंती करतो.

प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी धन्यवाद दिले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, हरकती, आक्षेप तोंडी व लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन केले.

८) <u>**श्री संतोष दत्तू दौंडे, राहणार-खर्डी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर**</u>

आता बैठकीत सांगण्यात आले की कारखान्यातील सांडपाणी हे कारखान्याच्या शेतात सोडले जाते. ते शेतात सोडत नाहित, तर ते कॅनॉलमध्ये सोडले जाते. त्याचा त्रास आम्हांला होतो. कारखान्यातील राख उडते, त्याचाही आम्हांला त्रासच होतो. कारण ती राख मक्यावर, जनावरांच्या वैरणीवर साठते. ती तशीच गुरांना दिली जाते व गुरांच्या पोटात जाते. कारखान्यापासून थोड्या अंतरावरच माझे घर आहे, कारखान्यातील बगॅस उडून जातो. त्या राखेमुळे

अजूनही माझे डोळे लाल आहेत, तर आपण नुसते पर्यावरणाबाबत काय सांगता? आमच्याकडे त्याचे फोटो आहेत.

प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की तुमचे म्हणणे चुकीचे नाही की राख उडते. चिमणीच्या धुराड्यातून जो धूर बाहेर पडतो, त्यास अत्याधुनिक असे ईएसपी (इलेक्ट्रो-स्टॅटिक प्रेसिपरेटर) ही सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यामुळे घातक प्रदूषके बाहेर पडत नाहित, त्यामुळे धुराची काळजी करण्याचे कारण नाही. पुढच्या वर्षी जो बॉयलर कार्यान्वित करण्यात येईल, त्यात अत्याधुनिक सयंत्रणा असेल. वाऱ्यामुळे बगॅस उडतो, मात्र स्थानिक शेतकरी कारखान्यातून शेतात घालण्यासाठी बगॅस नेतात. तो रस्त्यावरही पडतो, त्यामुळे बगॅसमुळे काहीही घातक परिणाम होईल असे वाटत नाही. सर्व शासकीय निर्देशांचे पालन करुनच प्रकल्प कार्यन्वित करण्यात येणार आहे. याउपर स्थानिकांशी चर्चा करुनच प्रकल्पात सुधारणा करण्यात येईल.

येथे परत आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप,टीकाटिप्पणी असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले.

उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. त्यावेळी आयोजक यांनी सांगितले की, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याची इतिवृत्तात नोंद

घेण्यात येणार आहे. प्राप्त लेखी सूचना, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांनी बैठकीत उपस्थित राहून सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे, प्रकल्प अधिकारी व शासकीय अधिकारी यांचे आभार मानले व अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक संस्थिगत करण्यात आली.

प्राप्त ०६ लेखी निवेदने/पत्रे/तक्रार अर्ज सोबत जोडलेली आहेत. व याबातचा तपशील खालीलप्रमाणे:-

१) श्री. समाधान विठ्ठल जगदाळे
२) श्री. संतोष दत्तु दौंडे
३) श्री. महालिंग दुधाळे
४) श्री. गणेश तात्या जाधव
५) श्रीमती वूटकुरी सुनंदा रेड्डी, पर्यावरणतज्ञ, धरित्री पर्यावरण परिरक्षण समस्थ

६) श्री. रंगाराव कोठाकोंडा, सेव्ह अर्थ मेट्रो अर्बन अँन्ड रुरल डेव्हलॉपमेंट सोसायटी

**(निखिल जालिंदर मोरे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, सोलापूर

**(शंकर एल. वाघमारे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, पुणे

**(सौ. शमा पवार),**
**अध्यक्षा,**
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर
जिल्हा- सोलापूर